# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-१

Phone No. - ०२०-२६१२३०६६/६७ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in


## प्रसिध्दीपत्रक

**संदर्भ** :- १) शासन पत्र क्र.टीईटी-२०२१/प्र.क्र.१६५/टीएनटी-१ दि.२६ ऑगस्ट, २०२१

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (MAHATET) २०२१ परीक्षा परिषदेमार्फत दि.१० ऑक्टोबर २०२१ रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आलेली आहे. सदर परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र भरणेकरीता दि.०३/०८/२०२१ ते ०५/०९/२०२१ या कालावधीत मुदत देण्यात आलेली आहे.

संदर्भीय पत्रानुसार व्यावसायिक अर्हतेच्या (डी.एड./बी.एड.व तत्सम) शेवटच्या वर्षात प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना परिक्षेला बसण्यास मुभा दिलेली आहे. सबब महाटीईटी २०२१ परीक्षेसाठी प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारास ऑनलाईन आवेदन पत्र भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. व्यावसायिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षात प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी आवेदन पत्र भरतांना व्यावसायिक अर्हता (Professional Qualification) माहिती भरतांना त्यांना लागु असलेल्या पदविका / पदवी या संदर्भात माहिती भरतांना लगतच्या मागील परीक्षेची (पदविका प्रथम वर्ष/पदवी तृतीय सत्र इ.) माहिती भरावी. प्रमाणपत्र क्रमांकाऐवजी संबंधितांनी त्यांचे परीक्षेचा बैठक क्रमांक नोंद करावा. आपले आवेदन पत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन भरणे आवश्यक आहे. आवेदन पत्र भरण्यासाठी अंतिम मुदत दि.०५/०९/२०२१ असून त्यानंतर कोणतेही आवेदन पत्र स्विकारले जाणार नाही.

**ठिकाण - पुणे**

**दिनांक - २७/०८/२०२१**

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे.